# अर्थशास्त्रीय विवेचनात मानवी हक्कांचा संदर्भ (विशेष संदर्भ - भारत)

**प्रा.डॉ.सौ.तेजस्विनी बाजीराव मुडेकर**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख,
कमला कॉलेज, कोल्हापूर.

*मानवी हक्कांसाठी केवळ मनुष्य असणे ही बाब आवश्यक मानली जाते. १३ व्या शतकात, नैसर्गिक हक्कांच्या स्वरूपात मानवी हक्कांचा प्रथम उल्लेख करण्यात आला. पुढे त्याला मुलभूत अधिकार व २० व्या शतकात मानवी हक्क किंवा अधिकार ही संज्ञा प्राप्त झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर मानवी हक्क विषयक विचारांना चालना मिळाली. "मानवी हक्क म्हणजे नैतिक तत्व व त्यांच्या समर्थनाचा संच होय." १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने मानवी हक्काचा जाहिरनामा स्वीकारला. मानवी हक्क जाहिरनाम्यात एकूण तीस कलमे आहेत.*

*मानवी क्षमतांचा पूर्ण विकास हा आर्थिक विकासात अभिप्रेत असतो. व्यक्तीला जगण्याचा, स्वातंत्र्याचा व सुरक्षिततेचा हक्क असताना आजही भारतात मुलीचा जन्म नाकारला जातो. ती स्वातंत्र्याचा, सुरक्षिततेचा हक्क उपभोगू शकत नाही. प्रत्येक व्यक्तीला योग्य राहणीमानाचा हक्क असताना भारतातील ३०% जनता मूलभूत गरजांची पूर्तताही करू शकत नाही, अशा दरिद्री अवस्थेत जीवन जगत आहे. सामाजिक सुरक्षा हे कल्याणकारी सरकारचे कार्य असूनही सर्वांना योग्य सुरक्षितता मिळू शकत नाही. गुलामीची प्रथा सरकारच्या कठोर भूमिकेने व शिक्षणाच्या प्रसारामुळे जवळजवळ नष्ट झाली आहे. प्रत्येकाला रोजगार निवडीचा हक्क आहे. परंतु भारतात बेरोजगारांची संख्याही प्रचंड आहे. स्त्रियांचा श्रम सहभागाचा दर कमी आहे. प्रत्येक बालकास शिक्षणाचा हक्क आहे. परंतु अजूनही अनेक बालके शाळाबाह्य आहेत तर बालकामगार समस्याही पूर्णपणे संपलेली नाही. सरकारने जनतेला तिचे हक्क व अधिकार उपभोगता यावेत यासाठी अनेक कायदे केले आहेत. तसेच विकासासाठी अनेक योजनाही राबविल्या आहेत. परंतु अजूनही अनेक अडथळे आहेत. शिक्षणाचा प्रसार, व्यक्तिगत सजगता, समाजाची मानसिकता बदलणे, सरकारची कठोर पावले, भ्रष्टाचारास आळा यामुळेच हे सर्व हक्क व्यक्तीस उपभोगता येतील.*

**प्रास्ताविक :**

मानवी हक्कांसाठी केवळ मनुष्य असणे ही बाब आवश्यक मानली जाते. त्यामुळे मनुष्याचे स्वरूप व स्वभाव, त्याच्या मुलभूत गरजा, त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडण-घडणीचे विविध पैलू यांचा विचार त्यात महत्त्वाचा ठरतो. मानवाच्या हक्कांचा विचार अत्यंत जूना आहे. १३ व्या शतकात, नैसर्गिक हक्कांच्या स्वरूपात मानवी हक्कांचा प्रथम उल्लेख करण्यात आला. पुढे त्याला मुलभूत अधिकार व २० व्या शतकात मानवी हक्क किंवा अधिकार ही संज्ञा प्राप्त झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर मानवी हक्क विषयक विचारांना चालना मिळाली.

सदर शोधनिबंधात अर्थशास्त्रीय विवेचनात काही निवडक मानवी हक्कांचा संदर्भ अभ्यासलेला असून भारतीय पार्श्वभूमीवर स्पष्टीकरण केले आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१. मानवी हक्क ही संकल्पना स्पष्ट करणे.

२. अर्थशास्त्रीय विवेचनात काही निवडक मानवी हक्कांचा संदर्भ भारतीय पार्श्वभूमीवर स्पष्ट करणे.

**अभ्यास पद्धती :**

शोध निबंधासाठी दुय्यम सामग्रीचा वापर केला असून संदर्भासाठी संदर्भग्रंथ, शासन प्रकाशित अहवाल, इंटरनेट यांचा आधार घेतला आहे.

**'मानवी हक्क' संकल्पना :**

मानवी हक्क हे मुख्यत: नैतिक तत्वांशी संबंधित असतात. मानवी हक्क म्हणजे नैतिक तत्व व त्यांच्या समर्थनाचा संच होय. काही तज्ञांच्या मते, "नैतिक आणि वैश्विक स्वरूपाचे अधिकार म्हणजे मानवी हक्क होय." हक्कांचे वैश्विक स्वरूप म्हणजे, मानवी हक्क प्रत्येकासाठी प्रत्येक ठिकाणी समान असतील.

**मानवी हक्कांचा जाहिरनामा :**

१९४५ साली संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली. जागतिक शांतता टिकविणे, भावी पिढ्यांचे महायुद्धाच्या आपत्तीतून रक्षण हे या संघाचे मुख्य उद्दिष्ट होते. ते साध्य करण्यासाठी जगातील सर्व राष्ट्रांमध्ये आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक सहकार्य वाढविणे गरजेचे होते. तसेच मानवी हक्कांनाही संरक्षण देणे आवश्यक होते. त्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघातील आर्थिक आणि सामाजिक परिषदेने १९४६ साली मानवी हक्कांची सनद तयार करण्यासाठी 'मानवी हक्क आयोग' नेमला. या आयोगाने केलेल्या मसुद्यावर संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत चर्चा होऊन १० डिसेंबर १९४८ रोजी महासभेने मानवी हक्काचा जाहिरनामा स्वीकारला. १० डिसेंबर हा दिवस 'मानवी हक्क दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. त्यामुळे मानवी हक्कांना आंतरराष्ट्रीय कायद्यात स्थान मिळाले आणि संयुक्त राष्ट्रसंघासारख्या जागतिक संघटनेचा आधार मिळाला. या ठिकाणी अखिल मानव जातीचे हक्क सुस्पष्ट स्वरूपात प्रथमच मांडण्यात आले. भारतात १९९३ मध्ये 'मानवी हक्क संरक्षण कायदा' संमत केला.

**भारताच्या संदर्भात मानवी हक्क :**

संयुक्त राष्ट्र परिषदेने स्वीकृत केलेल्या नागरी, राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक अधिकारांच्या आंतरराष्ट्रीय जाहिरनाम्यामध्ये व इतरही आंतरराष्ट्रीय जाहिरनाम्यातील भारतीय केंद्र सरकारने मान्य केलेले असे सर्व अधिकार, ज्यांना भारतीय संविधान व विविध कायद्यात मान्यता दिली गेली आहे आणि ज्यांची अंमलबजावणी भारतीय न्यायालये करू शकतात, असे सर्व अधिकार म्हणजे मानवी हक्क होत.

**मानवी हक्क जाहिरनाम्यामधील अर्थशास्त्राशी संबंधित कलमे :**

१९४८ मध्ये जो मानवी हक्कांचा जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात आला, त्यात एकूण ३० कलमे आहेत. पहिल्या दोन कलमांमध्ये मानवी समानतेचे विवेचन आहे. तिसऱ्या कलमात प्रत्येकाला जीविताचा, स्वातंत्र्याचा व सुरक्षिततेचा अधिकार आहे हे नमूद केले आहे. चौथ्या कलमात कोणीही गुलाम असणार नाही. तसेच माणसांची गुलाम म्हणून खरेदी-विक्री करता येणार

नाही. हे नमूद केले असून चौथ्या कलमात कोणाचाही शारीरिक छळ केला जाणार नाही, त्याला क्रूर, अमानुष वागणूक किंवा शिक्षा दिली जाणार नाही याचे विवेचन आहे. अर्थशास्त्रीय विवेचनात हे हक्क अत्यंत महत्वाचे मानले आहेत. कलम सतरामध्ये प्रत्येकास स्वत:ची किंवा इतरांबरोबर मालमत्ता निर्माण करण्याचा व तिचा वापर करण्याचा अधिकार आहे. हे मान्य केले आहे. कलम २२ हे सामाजिक सुरक्षिततेच्या हक्कांशी संबंधित आहे. समाजात रहाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याचे स्वातंत्र्य आहे. 'विकासाचा हक्क' या ठिकाणी अंतर्भूत आहे, की जो सर्व सामाजिक व आर्थिक हक्क सामावून घेतो. कलम २३ मध्ये प्रत्येकाला काम करण्याचा अधिकार आहे, आपल्या आवडीप्रमाणे रोजगार निवडण्याचा अधिकार आहे. कोणत्याही प्रकारे भेदभाव न करता समान कामासाठी समान वेतन घेण्याचा अधिकार आहे. तसेच स्वत:च्या आवडीनुसार व्यक्ती कामगार संघटनांचे सभासदत्व स्वीकारू शकते. कलम २४ मध्ये प्रत्येकास विश्रांतीचा, फुरसतीचा व पगारासह आठवड्याच्या सुट्टीचा अधिकार आहे. कलम २५ मध्ये स्वत:साठी व कुटुंबासाठी योग्य राहणीमानाचा तसेच अन्न, वस्त्र, निवारा, सामाजिक सुविधांचा अधिकार आहे. तसेच बेकारी, आजारपण, अपंगत्व, वृद्धत्व, वैधव्य या काळात सुरक्षिततेचा अधिकार आहे. मातृत्व व बालपणाच्या काळात विशेष काळजी व मदतीचा अधिकार आहे. कलम २६ मध्ये प्रत्येक व्यक्तीस शिक्षणाचा अधिकार देण्यात आला असून कमीतकमी प्राथमिक शिक्षण हे मोफत असावे. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण सर्वांना उपलब्ध असावे. उच्च शिक्षणात सर्वांना समान संधी मिळण्याचा अधिकार.

**मानवी क्षमतांचा विकास हे आर्थिक विकासाचे उद्दिष्ट :**

दुसऱ्या महायुद्धानंतर ज्या 'आर्थिक विकास' संकल्पनेचा विचार करण्यात आला ती संकल्पना उत्पादन, उत्पादकता व उपभोग वाढ या बाबींशी निगडीत होती. परंतु नंतर मानवी संसाधनाचे महत्त्व लक्षात आल्याने 'मानवी भांडवल गुंतवणूक' यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. आणि विकास दृष्टीकोनात भौतिक उत्पादनांकडून मानवावर भर देण्यात आला.

आर्थर लेविस यांच्या मते दारिद्रय, विषमता, बेकारी कमी झाली नसेल तर उत्पादन व उत्पन्न वाढूनही विकास झाला असे म्हणता येणार नाही. म्हणजेच विकास हा मानवाला केंद्रस्थानी ठेवूनच केला जावा. हे या विचारातून स्पष्ट होते.

अमर्त्यसेन यांचा मानवी विकासाचा दृष्टीकोन हा मानवी हक्काची कल्पना अधिक विस्तारित करणारा आहे. सेन यांनी विकास ही स्वातंत्र्याच्या विस्ताराची प्रक्रिया मानली आहे. विकासात मानवाला योग्य वाटणाऱ्या गोष्टींची निवड त्यांचा पाठपुरावा करण्याची संधी आणि स्वातंत्र्य या बाबी ते अंतर्भूत करतात. मानवी क्षमतांचा संपूर्ण विकास हे आर्थिक विकासाचे उद्दिष्ट आहे असे ते मानतात.

**भारतीय पार्श्वभूमीवर अर्थशास्त्रीय विवेचनात मानवी हक्कांचा संदर्भ :**

**१. जगण्याचा, स्वातंत्र्याचा व सुरक्षिततेचा हक्क :**

व्यक्ती विकास, व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रथमत: प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता आले पाहिजे. सन्मानाने जगण्यासाठी पुरेसे उत्पन्न व्यक्तिला मिळाले पाहिजे. तिचा विकास व्हावयाचा असेल तर आचार, विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य हवे. संयुक्त राष्ट्रसंघाने १९८९ मध्ये जगापुढे बालहक्कांचा करार मांडला. यामध्ये बालकांच्या अस्तित्वाचा हक्क मान्य करण्यात

आला. त्यामध्ये मुलींना जन्मण्याचा हक्क असतो असा विशेष हक्क नमूद करण्यात आला आहे. त्या दृष्टीकोनातून विचार करता, आज भारतात स्त्री-भ्रूण हत्येचे प्रमाण वाढले आहे. मुलीचा जगात येण्याचा हक्कच हिरावून घेतला जात आहे. १९०१ मध्ये भारतातील स्त्री-पुरूष प्रमाण दरहजारी ९७२ होते ते १९५१ मध्ये ९४६ झाले. १९९१ मध्ये ९२७, २००१ मध्ये ९३३ व २०११ ज्या जनगणनेत ९४० झाले. ० ते ६ वयोगटातील स्त्री-पुरूष प्रमाण २००१ मध्ये ९२७ होते ते २०११ मध्ये ९१४ इतके कमी झाले. जागतिक विकास अहवाल २०१२ नुसार सन २००८ मध्ये जगातील ३८.८२ लाख स्त्रिया 'गायब' (Missing) झाल्या, त्यापैकी १/५ म्हणजे ८.५६ लाख स्त्रिया भारतातील होत्या. पैकी २.५७ लाख अजून जन्मासही यायच्या होत्या. २.५१ लाख बालवयात तर ३.४८ लाख १५ ते ५९ वयोगटातील होत्या. याठिकाणी स्त्रियांच्या जगात येण्याच्या व जगण्याच्या हक्कावरच गदा आल्याचे दिसते. अजूनही भारतात मनुचा 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हती' हा दृष्टीकोन ठेवला जातो. स्त्रियांना समाजात निकृष्ट दर्जा दिला जातो. विविध कायद्याद्वारे सरकारने स्त्रियांच्या जगण्याच्या हक्काला सबळ पाठींबा दिला आहे. त्यामध्ये सतीप्रथा प्रतिबंध कायदा (१९८७), हुंडा प्रतिबंधक कायदा (१९२९), कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा (१९६१), गर्भलिंग चाचणी प्रतिबंध कायदा (१९९४) यांचा उल्लेख करता येईल.

**२. योग्य राहणीमानाचा हक्क :**

अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. या गरजांची परिपूर्ती झाल्यानंतर व्यक्ती विकासाच्या पुढच्या टप्प्यावर जाते. मात्र भारतात या किमान गरजांची पूर्तीही न होऊ शकणारे, दारिद्रय रेषेखाली अनेक लोक जीवन जगत आहेत. मानव विकास अहवाल २०११ नुसार भारताचा बहुआयामी दारिद्रय निर्देशांक ०.२९६ असून भारताचा क्रम ११९ वा लागतो. २०१० च्या वैश्विक भूक निर्देशांकानुसार १२२ देशांपैकी २९ राष्ट्रे धोक्याच्या व अतिशय धोक्याच्या स्थितीत आहेत. त्यापैकी भारत एक आहे. डॉ.सी.रंगराजन समितीच्या (जून २०१४) अंदाजानुसार सन २००९-१० मध्ये भारतातील ३८.२% लोकसंख्या दरिद्री होती व २०११-१२ मध्ये हे प्रमाण २९.५% म्हणजेच भारतातील अंदाजे ३०% जनतेला अन्न, वस्त्र निवारा या मुलभूत गरजाही पूर्ण करता येत नाहीत. दारिद्रय निर्मूलनासाठी सरकारकडून अनेक योजना राबविल्या जात आहेत. सामुदायिक विकास योजना (१९५२), एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (१९७६-७७), वीस कलमी कार्यक्रम (१९७६), किमान गरजा कार्यक्रम (१९७४), अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम (१९७३), वाळवंट विकास कार्यक्रम (१९७७), राष्ट्रीय ग्रामीण विकास कार्यक्रम (१९८०) स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण (१९७९), ग्रामीण विकासाचा धडक कार्यक्रम (१९६१), अंत्योदय योजना (१९७७), पंतप्रधान एकात्मिक दारिद्रय निर्मूलन कार्यक्रम (१९९५-९६), अंत्योदय अन्न योजना (२००२), अन्नपूर्णा योजना (१९६१), निवारा निर्माण करून देण्यासाठी समग्र आवास योजना (१९९९-२०००), इंदिरा आवास योजना, राजीव गांधी आवास योजना या योजनांद्वारे दारिद्रय निर्मूलन, निवाऱ्याची सोय करण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात आहे.

**३. सामाजिक सुरक्षिततेचा हक्क :**

सर विल्यम बेव्हरीज यांच्या व्याख्येनुसार "सामाजिक सुरक्षा म्हणजे बेकारी, आजारपण, अपंगत्व, वृद्धत्व, मृत्यू यासारख्या संकटांपासून कामगारांचे रक्षण करण्यासाठी समाजाने पर्यायाने सरकारने दिलेले संरक्षण म्हणजे सामाजिक सुरक्षितता होय. भारतीय घटनेच्या ४१ व्या कलमानुसार सरकारने सामाजिक सुरक्षितता उपायांची जबाबदारी उचलली आहे. कल्याणकारी

सरकारचे ते एक महत्वपूर्ण कार्य समजले जाते. भारतातही या संबंधीचे विविध कायदे करण्यात आले आहेत. उदा.कामगारांसाठी नुकसान भरपाई कायदा (१९२३), मातृत्व लाभासंबंधीचा कायदा (१९६१), भविष्य निर्वाह निधी कायदा (१९५२), राज्य कामगार विमा कायदा (१९४८), ग्रॅच्युइटी योजना (१९७२), बेकारी विमा योजना (१९५३), कुटुंब पेन्शन योजना (१९७१), मृत्यूनंतर मिळणारी मदत १९६४ पासून मदत देण्यात येऊ लागली. राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना (२००८-०९), राष्ट्रीय परिवार सहाय्य योजना, आम आदमी विमा योजना (२००७-०८), इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती योजना, जननी सुरक्षा योजना इत्यादी योजना राबविल्या जातात.

**४. गुलामी विरूद्धचा हक्क :**

प्रत्येकाला स्वतंत्रपणे जगण्याचा हक्क आहे. कोणीही एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीवर मालकी दाखवून तिला गुलाम बनवू शकत नाही. भारताच्या घटनेनुसार १९५० पासून कोणत्याही प्रकारची गुलामगिरी लादणे हा शिक्षापात्र गुन्हा ठरविण्यात आला. कायद्याने वेठबिगार, भूदास या पद्धतीवर बंधने आली. परंतु अज्ञान, सामाजिक रूढी-परंपरा, सामाजिक दबाव यामुळे भारतात गुलामगिरी फारशी दूर होऊ शकली नाही. शेवटी २५ ऑक्टोबर १९७५ मध्ये राष्ट्रपतींच्या वटहुकुमाद्वारे वेठबिगारांचा शोध घेऊन त्यांना मुक्त करण्यात आले. त्यांचे पुनवर्सन करून त्यांना आर्थिक मदतही देण्यात आली. सरकारचे १९७६ मध्ये वेठबिगार प्रथा (प्रतिबंध) कायदा केला. एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीस गुलाम म्हणून वागविण्यास गुन्हेगारास तीन वर्षे कैद व आर्थिक दंड होऊ शकतो. सरकारची कठोर भूमिका, शिक्षणाचा वाढता प्रसार यामुळे ही प्रथा जवळजवळ नष्ट झाली आहे.

**५. रोजगार निवडीचा अधिकार :**

भारतातील प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या आवडीनुसार रोजगार निवडण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. परंतु भारतात रोजगार संधीची उपलब्धी मोठ्या प्रमाणात नसल्याने बेरोजगारीचा दरही अिधक आहे. नॅशनल सॅंपल सर्व्हेच्या अहवालानुसार (N.S.S.) सन २००९-१० मध्ये भारतात बेरोजगारीचा दर २.५% होता. तो सन २०११-१२ मध्ये २.७% इतका वाढविल्याचे दिसते. भारतात पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांचा श्रम सहभागाचा दर कमी असल्याचे दिसते.

**तक्ता क्र.१**

**श्रम सहभागाचा दर (%)**

| वर्ष | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|
| पुरूष | ५२.६ | ५१.६ | ५१.९ |
| स्त्रिया | १९.७ | २२.७ | २५.७ |

आधार : जनगणना २००१

१९८१ च्या तुलनेत स्त्रियांच्या श्रम सहभागाचा दर थोडा वाढल्याचे दिसते. तरीही पुरूषांच्या तुलनेत तो जवळजवळ १/२ आहे. एन.एस.एस.च्या ६८ व्या फेरीनुसार जुलै २०११ ते जून २०१२ मध्ये Worker Population Ratio पुरूषांचा ५४% तर स्त्रियांचा २२% आहे.

प्रत्येक काम मागणाऱ्या व्यक्तीला काम उपलब्ध होत नाही. सर्वांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सरकारकडून अनेक योजना राबविल्या जातात. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजना, (२००६-०७) जवाहर रोजगार योजना (१९८९), नवीन रोजगार निर्मिती योजना (१९९३), पंतप्रधान रोजगार योजना (१९९३), स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, प्रधानमंत्री रोजगार सृजन कार्यक्रम (२००८) या योजनाद्वारे रोजगार पुरविण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु तरीही भारतात बेरोजगारीचे अस्तित्व दिसून येते.

समान कामासाठी समान वेतनाचा हक्क असला, तसे कायद्याने बंधन असले (समान वेतन कायदा १९७६) तरी अजूनही शेतीक्षेत्रात, बांधकाम क्षेत्रात पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी वेतन दिले जाते.

असंघटित कामगारांच्या बाबतीत आठवड्याची सुट्टीही दिली जात नाही.

**६. शिक्षणाचा अधिकार :**

मानवी हक्काचे कलम २६ नुसार प्रत्येक व्यक्तीस शिक्षणाचा अधिकार असल्याचे मान्य केले आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील सरासरी साक्षरता दर ७४.०४ % आहे म्हणजे अजूनही २५.९६% लोकसंख्या अशिक्षित आहे. स्त्रियांच्या साक्षरतेचा विचार करत २०११ च्या जनगणनेत ६५.४६ टक्के स्त्रिया साक्षर होत्या म्हणजेच अजूनही ३५.५४ टक्के स्त्रिया निरक्षर आहे, शाळा गळतीचा दर (Drop out rate) दर मुलींच्या बाबतीत अधिक आहे.

शरीराने व मनाने अपरिपक्व असणाऱ्या बालकांना हक्क मिळायला हवेत याकडे दुर्लक्ष होत आहे हे लक्षात आल्यानंतर बालकांच्या हक्काचा जो करार मांडला त्यातील विकासाच्या हक्का मध्ये शिक्षण, कला, कल्पनेचा विकास, मानसिक आधार, विकासासाठी सुरक्षित परिसर, व्यवसाय शिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन व सल्ला, खेळण्याची संधी, मुलींना घरकामाऐवजी खेळण्याची संधी या बाबी विशेषत्वाने नमूद करण्यात आल्या आहेत. तरी भारतात आज शिक्षणापासून वंचित असणाऱ्या बालकामगारांची समस्या असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र.२**

**भारतातील बालकामगार (कोटी)**

| वर्ष | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | १.३४ | १.४५ | १.०७ | १.३६ | १.१३ | १.२६ | ०.४३ |

आधार - जनगणना १९५१ ते २०११

१९५१ च्या तुलनेत बालकामगारांची संख्या २०११ च्या जनगणनेत कमी झाली असली तरी ४३,५३,२४७ इतकी बालके अजूनही आर्थिक कार्यात गुंतलेली आढळतात.

१९६८ च्या शैक्षणिक धोरणात वय वर्षे १४ पर्यंतच्या प्रत्येक मुलाला शिक्षण मिळाले पाहिजे. प्राथमिक शिक्षण हे मोफत असावे. असे नमूद केले असले तरी बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा ४ ऑगस्ट २००९ मध्ये संसदेत मंजूर

करण्यात आला. त्यामध्ये वय वर्षे ६ ते १४ मधील प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे. तो त्याचा हक्का आहे हे कायदयाने मान्य करण्यात आले.

भारत सरकारकडून प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी काही योजना राबविल्या जातात. त्यामध्ये सर्व शिक्षा अभियान (२००१), राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (२००९), राष्ट्रीय मध्यान्ह भोजन योजना (१९९५), कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (२००४) या योजनांचा उल्लेख करता येईल.

बालमजूरी थांबविण्यासाठी घटनेतही तरतूदी आहेत. तसेच विविध कायद्यांचाही आधार घेतला आहे. त्यामध्ये स्वातंत्र्यानंतरच्या कायद्यांचा विचार केला असता १९४८ चा फॅक्टरी ॲक्ट, १९४९ चा (सुधारित) बालमजूर कायदा, १९५१ चा बालमजुरी कायदा (सुधारणा), १९५१ चा बागायत मजुरीसंबंधी कायदा, १९५२ खाण मजूर कायदा, १९५४ फॅक्टरी ॲक्ट (सुधारित), १९५८ व्यापारी-जहाज वहातूक कायदा, १९६१ मोटार वहातूक कामगार कायदा, १९६१ प्रशिक्षणार्थीबाबत कायदा, १९६६ बिडी व सिगार मजूर कायदा, १९७८ बालमजुरी कायदा (सुधारणा), १९८६ बाल कामगार (बंदी व नियंत्रण) या सर्व कायद्यांमधून बालमजूरीला बंदी घालण्यात आली आहे. कायद्याने बंदी असली तरी बेकायदेशीर-रितीने बालकांना कामास लावले जाते.

**निष्कर्ष :**

मानवी क्षमतांचा पूर्ण विकास हा आर्थिक विकासात अभिप्रेत असतो. व्यक्तीला जगण्याचा, स्वातंत्र्याचा व सुरक्षिततेचा हक्क असताना आजही भारतात मुलीचा जन्म नाकारला जातो. ती स्वातंत्र्याचा, सुरक्षिततेचा हक्क उपभोगू शकत नाही. प्रत्येक व्यक्तीला योग्य राहणीमानाचा हक्क असताना भारतातील ३०% जनता मूलभूत गरजांची पूर्तताही करू शकत नाही, अशा दरिद्री अवस्थेत जीवन जगत आहे. सामाजिक सुरक्षा हे कल्याणकारी सरकारचे कार्य असूनही सर्वांना योग्य सुरक्षितता मिळू शकत नाही. गुलामीची प्रथा सरकारच्या कठोर भूमिकेने व शिक्षणाच्या प्रसारामुळे जवळजवळ नष्ट झाली आहे. प्रत्येकाला रोजगार निवडीचा हक्क आहे. परंतु भारतात बेरोजगारांची संख्याही प्रचंड आहे. स्त्रियांचा श्रम सहभागाचा दर कमी आहे. प्रत्येक बालकास शिक्षणाचा हक्क आहे. परंतु अजूनही अनेक बालके शाळाबाह्य आहेत तर बालकामगार समस्याही पूर्णपणे संपलेली नाही. सरकारने जनतेला तिचे हक्क व अधिकार उपभोगता यावेत यासाठी अनेक कायदे केले आहेत. तसेच विकासासाठी अनेक योजनाही राबविल्या आहेत. परंतु अजूनही अनेक अडथळे आहेत. शिक्षणाचा प्रसार, व्यक्तिगत सजगता, समाजाची मानसिकता बदलणे, सरकारची कठोर पावले, भ्रष्टाचारास आळा यामुळेच हे सर्व हक्क व्यक्तीस उपभोगता येतील.

**संदर्भ :**


१. तुरकर चंद्रसेन (संपादक), (२००८), महिला कायदे व अधिकार, यशदा, पुणे.

२. डॉ.शेख आर.के. (२०१४), बालकामगार समस्या व समाधान, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

३. जहागिरदार मुक्ता (२००९), आर्थिक चिकित्सा, सेंटर फॉर इकॉनॉमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती.

4. Puri V.K., Misra S.K. (2013), India Economy, Himalaya, Publishing House, New Delhi.
5. Flash, Statistics Published by National University of Educational Planning and Administration 2013.
६. Census 2011, Govt. of India.
7. Ilustrated Version-Universal Declaration Human Rights.
८. शासनाच्या अधिकृत वेबसाईटस्.